॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

**Fax : (02462) 215572** | **Public Relations Office (PRO)** | **website: srtmun.ac.in**

**Phone: (02462) 215325** | **जनसंपर्क कार्यालय** | **E-mail: pro@srtmun.ac.in**

संदर्भ क्र.: ज.का./२०२३-२४/२९६ दि.१५/०१/२०२४

## 'स्वारातीम' विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. शिंदे आणि संचालक डॉ. माने यांचा निरोप समारंभ संपन्न

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. सर्जेराव शिंदे हे दि. १ जानेवारी रोजी कार्यमुक्त झाले होते. यानिमित्त त्यांचा दि. १३ जानेवारी रोजी दु. ०४:०० वा. विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहामध्ये निरोप समारंभाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

त्यांच्यासमवेत नवोपक्रम नवसंशोधन व साहचर्य विभागाचे संचालक डॉ राजाराम माने हे दि. ३१ डिसेंबर रोजी कार्यमुक्त होवून पूर्वीच्या भौतिकशास्त्र संकुलामध्ये आपल्या मूळ प्राध्यापक पदावर रुजू झाल्यामुळे त्यांचाही निरोप समारंभाचा कार्यक्रम दि. १३ जानेवारी रोजी घेण्यात आला.

डॉ. सर्जेराव शिंदे यांना चाकूर येथील भाई किशनराव देशमुख महाविद्यालय येथे त्यांच्या मूळ प्राचार्य पदावर रुजू होण्यासाठी विद्यापीठाच्या कुलसचिव पदावरून कार्यमुक्त करण्यात आले होते.

यावेळी व्यासपीठावर विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर, प्र-कुलगुरू डॉ. माधुरी देशपांडे, प्र. कुलसचिव डॉ. शशिकांत ढवळे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. दिगंबर नेटके, प्र.वित्त व लेखा अधिकारी डॉ. श्रीकांत अंधारे, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. प्रशांत पेशकार, हनमंत कंधारकर, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सूर्यप्रकाश जाधव, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. मलीकार्जुन करजगी यांची यावेळी व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांनी कुलसचिव डॉ. सर्जेराव शिंदे आणि संचालक डॉ. राजाराम माने या दोघांचाही शाल, सन्मानचिन्ह, मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन सत्कार व सन्मान करण्यात आला.

यावेळी विद्यापीठातील व विद्यापीठाशी संलग्नित सर्वच सर्वच महाविद्यालयातील प्राचार्य, शिक्षक, नातेवाईक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी कुलसचिव डॉ. सर्जेराव शिंदे यांचा सत्कार केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. जगदीश कुलकर्णी यांनी केले.

------------------------------------------------------------------------------------------------------------------------